

सोलापूर महानगरपालिका
कामगारकल्याण जनसंपर्क
विभाग



# सोलापूर महानगरपालिकेमध्ये होम मिनिस्टर चे कार्यक्रमाचे आयोजन

**Volume** III **Issue** 04 Date 13-03-2024

## सोलापूर महानगरपालिकेच्या होम मिनिस्टर च्या पैठणीचे मानकरी ठरल्या दर्शना काटेवाल

जागतिक महिला दिनाच्या औचित्य साधून  महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने  सोलापूर महानगरपालिकेचे महिला अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी आज सोलापूर महानगरपालिकेमध्ये होम मिनिस्टर चे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या होम मिनिस्टर च्या कार्यक्रमांमध्ये एकूण  120 महिला सहभागी झाल्या होत्या. या सर्व महिलांमध्ये विविध स्पर्धा घेण्यात आले या स्पर्धेमधून तीन विजेते काढण्यात आले असून त्यामध्ये प्रथम क्रमांक दर्शना काटेवाल, द्वितीय क्रमांक रेणुका वागालोलू, तृतीय क्रमांक मेहरून तांबोळी  या तिन्ही विजेतांना सोलापूर महानगरपालिकेचे वतीने पैठणी देण्यात आली प्रसंगी सोलापूर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त निखिल मोरे यांच्या शुभहस्ते तर सहाय्यक आयुक्त ज्योती भगत- पाटील व सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत विजेत्यांना पैठणी देण्यात आले. याप्रसंगी वीर माता रुक्मिणी सिद्राम कांबळे तसेच वीर पत्नी नीता शशिकांत कांबळे यांचा सत्कार महापालिकेच्या वतीने करण्यात आला. यावेळी विधी अधिकारी संध्या भाकरे, स्नेहल चपळगावकर, महिला व बालकल्याण अधिकारी विठ्ठल कस्तुरे, वर्षाराणी कस्तुरे,मोहन कांबळे मल्लेश नराल, बळवंत जोशी,प्रथमेश सदाफुले, सविता शिंदे  आदी मान्यवर उपस्थित होते.सोलापूर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने वर्षभरामध्ये विविध अशा कार्यक्रम आयोजित करण्यात येतात त्याचबरोबर महिलांच्या सक्षमीकरणासाठी  शहरातील महिला व मुलींना एम.एस .सी.आय.टी,टॅली, बँकिंग, फॅशन डिझायनिंग, लेडीज टेलर,ब्युटी पार्लर अशे विविध प्रशिक्षण महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने देण्यात येतात. या आर्थिक वर्षामध्ये महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने आंतरराष्ट्रीय खेळाडूंना आर्थिक मदत म्हणून प्रत्येकी 50हजार धनादेश देण्यात आला. सन 2024 25 या आर्थिक वर्षामध्ये सोलापूर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने अशाच विविध महिला व मुलींसाठी विविध योजना राबवण्यात येईल अशी ग्वाही सहाय्यक आयुक्त ज्योती भगत पाटील यांनी दिली.